भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय २०१३-१४/८२
डीजीबीए.सीडीडी.क्र.एच ७९१७/१३.०१.२९९/२०१३-१४ जुलै ०१, २०१३

अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक
मुख्य कार्यालय (सरकारी लेखा विभाग)
भारतीय स्टेट बॅंक व सहाय्यक संस्था,
सर्व राष्ट्रीयीकृत बँका
(पंजाब आणि सिंध बँक आणि आंध्र बँक वगळून)
ॲक्सिस बँक लि./आयसीआयसीआय बँक लि./एचडीएफसी बँक लि.
स्टॉक होल्डिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (एसएचसीआयएल)

महोदय/महोदया

**रिलिफ/बचत रोखे योजनांमधील नामनिर्देशन सुविधेवरील महापरिपत्रक**

कृपया वरील विषयावरील आमचे महापरिपत्रक क्र. डीजीबीए.सीडीडी.क्र.एच ८५७४/१३.०१.२९९/२०१२-१३ दि. जुलै ०२, २०१२ चा चा संदर्भ घ्यावा.

(२) वरील विषयावरील सर्व कार्यकारी सूचना एकाच जागी मिळाव्यात ह्यासाठी, जून ३०, २०१३ पर्यंत दिल्या गेलेल्या सूचनांचे एकत्रीकरण केलेले महापरिपत्रक सोबत जोडले आहे आणि ते आरबीआयच्या वेबसाईटवरही (http://www.rbi.org.in) टाकण्यात आले आहे.

आपली विश्वासु

(संगिता लालवाणी)
महा व्यवस्थापक

सोबत : एक पान जोडले आहे.

---

सरकारी आणि बँक लेखा विभाग, केंद्रीय कार्यालय, ४था मजला, मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन समोर, भायखळा मुंबई-४०० ००८,
टेलि-(०२२) २३०८ ४१२१,; फॅक्स क्र. (०२२) २३०० ०३७०/२३०१ ६०७२/२३०१ ००९५.
ईमेल : cgmicdgbaco@rbi.org.in

सावधानतेचा इशारा : बँक खात्याचा तपशील पासवर्ड ह्यासारखी वैय्यक्तिक माहिती मागविण्याबाबत, आरबीआय, कधीही ईमेल्स, एसएमएस पाठवत नाही किंवा फोन ही करत नाही. आरबीआय, कोणाचा निधी ठेवून घेत नाही किंवा देऊ करत नाही. प्रकारच्या कोणत्याही ऑफर्सना प्रतिसाद देऊ नका.

**महापरिपत्रक**
**रिलिफ/बचत रोखे योजनांमधील नामनिर्देशन सुविधा**

१) प्रोमिसरी नोट किंवा बेअरर बॉंडच्या स्वरुपात नसलेले सोडून,रिलिफ/बचत रोख्यांचा एकमेव धारक किंवा सर्व संयुक्त धारक (निवेशक), एक किंवा अधिक व्यक्तींना, नामनिर्देशित करु शकतात व त्या एकमेव किंवा संयुक्त धारकाचा मृत्यु झाल्यास त्या व्यक्तींना ते रिलीफ/बचत रोखे मिळविण्याचा व त्यावरील प्रदान मिळविण्याचा हक्क असेल. मात्र नामनिर्देशित केलेली व्यक्ती किंवा त्या व्यक्तीपैकी प्रत्येकजण अशा प्रकारचा रोखा धारण करण्यास सक्षम असली पाहिजे.

**२) असे नामनिर्देशन त्या रोख्याच्या परिपक्वतेपूर्वी केले जावे.**

३) जेथे दोन किंवा अधिक व्यक्तींच्या नावे नामनिर्देशन केले असेल तेथे, त्यांच्यापैकी एका व्यक्तीचा किंवा कोणत्याही व्यक्तीचा मृत्यु झाल्यास, जीवित असलेला एक किंवा अनेक नामनिर्देशितांना ते रिलिफ/बचत रोखे मिळविण्याचा व त्यावरील प्रदान मिळविण्याचा हक्क असेल.

४) एखाद्या रिलीफ/बचत रोख्यांच्या धारकाने.धारकांनी केलेले नामनिर्देशन, विहित केलेल्या रितीने नवीन नामनिर्देशन करुन आणि ते लेखी स्वरुपात, प्राधिकृत सार्वजनिक/खासगी क्षेत्रातील बँकेच्या नेमलेल्या शाखेकडे सादर करुन, बदलले किंवा रद्द केले जाऊ शकते.

५) नामनिर्देशित अल्पवयीन असल्यास,रिलीफ/बचत रोख्याचे धारक, धारकांचा मृत्यु झाल्यास, त्या नामनिर्देशिताच्या, तो अल्पवयीन असल्याच्या काळात, त्याच्या वतीने, त्या रिलीफ/बचत रोख्याचे उत्पन्न मिळण्यासाठी, अल्पवयीन नसलेल्या कोणत्याही व्यक्तीची नेमणुक करु शकतात.

६) एखाद्या बॉंड लेजर अकाऊंट (बीएलए) मधील, प्रत्येक गुंतवणुकीसाठी निवेशक वेगवेगळे नामनिर्देशन करु शकतात (वरील (२) मधील अटींचे पालन झाले असल्यास)

७) एजन्सी बँकांनी “नामनिर्देशनाची पोचपावती”द्यावी.

८) ८% बचत (करयुक्त) बॉंड्स २००३ च्या बाबत (सबस्क्रिप्शन सुरु असलेला सध्या हा एकच बॉंड आहे), त्याचा एकमेव धारक किंवा सर्व संयुक्त धारक एखाद्या अनिवासी भारतीयाला (एनआरआय) त्याचा/त्यांचा नामनिर्देशित करु शकतात आणि त्याबाबतचे व्याज प्रदान आणि/किंवा परिपक्वता मूल्य ह्यांना एनआरआयना लागु असणारे विनियम लागु असतील.

**अपवाद** - पुढील बाबतीत नामनिर्देशन करण्यास परवानगी नाही :-

अ) एखादा बीएलए एखाद्या प्रौढ व्यक्तीने अल्पवयीन व्यक्तीच्या वतीने धारण केला असल्यास
ब) धारकाचा त्या बीएलएमध्ये हितसंबंध नसून तो केवळ प्राधिकृतपणे किंवा कायद्याने दिलेल्या क्षमतेत धारण केला असल्यास

**नामनिर्देशन रद्द करणे** - पुढील बाबतीत आधी केलेले नामनिर्देशन आपोआप रद्द होईल.

अ)धारकाने/धारकांनी एजन्सी बँकांकडे नामनिर्देशन बदली किंवा रद्द करण्यासाठी अर्ज केल्यास व ते बदलीकरण किंवा रद्दीकरण कार्यालयाने पंजीकृत केले असल्यास.

ब) धारकांनी ते प्रमाणपत्र दुसऱ्याच एखाद्या पक्षाला हस्तांतरित केल्यास.

वरील महापरिपत्रक, ह्या विभागाच्या ज्या परिपत्रकांवर आधारित तयार करण्यात आले आहे. त्यांची यादी खाली दिली आहे.

i) संदर्भ. मेमोरँडम ऑफ प्रोसिजर - रिलीफ बाँड साठी
ii) संदर्भ. सीओ.डीटी.१३.०१.२०१/४०८७/२०००-०१ दिनांक .१६-२-२००१
iii) संदर्भ. सीओ.डीटी.१३.०१.२०१/४८५४/२०००-०१ दिनांक .१९-३-२००१
iv) संदर्भ. सीओ.डीटी.१३.०१.२९८/एच-३४१०/२००३-०४ दिनांक .२०-१२-२००३
v) संदर्भ. सीओ.डीटी.१३.०१.२९९/एच -३४२६/२००३-०४ दिनांक.२०-१२-२००३
vi) संदर्भ. डीजीबीए.सीडीडी. क्र. एच -२१७३/१३.०१.२९९/२००८-०९ दिनांक २-०९-२००८

*(काही विशिष्ट प्रश्नांबाबत सविस्तर स्पष्टीकरण पाहिजे असल्यास कृपया वर संदर्भित केलेल्या परिपत्रकांचा संदर्भ घेण्यात यावा).*